**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

फुलांचे हार पुरवठा कामाचे जाहीर दरपत्रक.

फुलांचे हार पुरवठा करणेकामी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्याबाबतची माहिती, अटी, शर्ती व दरपत्रक फॉर्म www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावर व संत तुकाराम भवन येथे उपलब्ध आहे. दरपत्रक दि.२२/११/२०१७ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत पाठवावेत.

स्वा/—
कार्यकारी अधिकारी
(संपर्क क्र. ०२१८६ २२४४६६)

## श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

फुलांचे हार पुरवठा कामाची जाहीर दरपत्रक

**माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....**

१. नमूना दरपत्रकाचा कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील. दरपत्रक फॉर्म स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक फुलांचे हार पुरवठा कामी भरलेली आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. दरपत्रक समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

२. अनामत रक्कम रू.५०००/—डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. डी.डी. 'कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर' यांचे नावे काढावा.

३. पुरवठादाराने दरपत्रक फॉर्ममध्ये नमुद केलेल्या दराने दि.०१/१२/२०१७ ते ३१/०५/२०१७ या कालावधीत मालाचा पुरवठा इकडील मागणी प्रमाणे करणे आवश्यक आहे.

४. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमुन्यांतच मालाचा पुरवठा करणेचा आहे.

५. सर्व माल चांगल्या गुणवत्तेचा असणे आवश्यक आहे.

६. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५ टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

७. माल खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

८. पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

९. मालाचा पुरवठा करणेचे ठिकाण नित्योपचार विभाग व पंढरपूर शहरातील बाहेरील परिवार देवता मंदिरे येथे करणे आवश्यक आहे.

१०. दरपत्रकात नमुद मालाचा दर सर्व करासहीत नमुद करावा. माल पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

११. दरपत्रकात नमुद सर्व मालाचा दर नमूद करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१२. सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

१३. सदर कामासाठी कोणतीही ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१४. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस निविदाधारक जबाबदार राहील.

१५. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

१६. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर होईल, त्यांनी रक्कम रूपये १००/— चे स्टॅम्प पेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (affidivit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

१७. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१८. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर दरपत्रक कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

१९. प्रशासकीय व अन्य कारणास्तव दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

———————‘‘————————

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिति, पंढरपूर

**<u>दरपत्रक फॉर्म</u>**

<u>फुलांचे हार पुरवठा कामाचे दरपत्रक.</u>

प्रति,

मा.कार्यकारी अधिकारी,

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,

पंढरपूर, जि. सोलापूर.

विषय:— <u>फुलांचे हार पुरवठा करणेकामी दरपत्रक.</u>

ठेकेदाराचे पूर्ण नाव :— श्री.——————————————————————

पूर्ण पत्ता :— ————————————————————————

————————————————————————

मोबाईल कं.:— ————————————————————————

महोदय,

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने फुलांचे हार पुरवठा कामाची दि.१६/११/२०१७ रोजीचे दैनिक वर्तमानपत्र दै. पुढारी, सोलापूर मध्ये प्रसिध्द झालेल्या दरपत्रकाच्या जाहिरातीप्रमाणे आमच्याकडे उपलब्ध असलेल्या मालाचे दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहेत.

| अ. क्र. | पुरवठा करावयाच्या मालाचा तपशील | परिमाण (नग /किलो इ) | अंदाजित किमान दर रू. | दर प्रती नग/किलो रक्कम | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अंकी (रू.) | अक्षरी(रू.) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | छोटे सिंगल हार | प्रती नग | २९.०० | | |
| २ | मोठे मध्यम हार | प्रती नग | ५५.०० | | |
| ३ | सिंगल तुलसी हार | प्रती नग | २०.०० | | |
| ४ | डबल सत्कार हार | प्रती नग | ९९.०० | | |
| ५ | सुट्टी तुळशी व फुले | प्रती किलो | ७०.०० | | |
| ६ | तुरे | प्रती नग | ७.०० | | |

वरील दर श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर व पंढरपूर शहरातील मंदिर समितीच्या मालकीची २८ परिवार देवता मंदिरे येथे पोहोच खर्च आणि सर्व प्रकारचे करासहीत आकारण्यात आले आहेत.

सदर दराने दि.०१/११/२०१७ ते दि.३१/०५/२०१७ या कालावधीत फुलांचे हार पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. रू. ५,०००/— अनामत रकमेचा मुळ डी.डी. किंवा रोख अनामत रक्कम भरलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे फुलांचे हार पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

दिनांक /११/२०१७ पुरवठाधारकाची सही व शिक्का

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत

१. अनामत रक्कमेचा डी.डी/ रोखीच्या पावतीची झेरॉक्स प्रत.
२. पूर्वी फुलांचे हार पुरवठा केलेल्या कामाच्या अनुभवाची प्रमाणपत्रे.
३. आधारकार्ड.
४. मुंबई दुकाने व संस्था अधिनियमामध्ये असलेला परवाना. (Shop Act Lincence)
५. पॅन कार्ड.